संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवा काळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# संस्कृतीला संक्रमित करणारा उपक्रम

**सृष्टीतले** अतिशय बारीक बारीक बदलसुध्दा लक्षात घेऊन त्याचा व्यक्ती आणि समाजाच्या मानसिकतेवर कसा परिणाम घडू शकतो आणि त्या परिणामाला अधिक विधायक किंवा सकारात्मक रूप कसे देता येईल याची अनेक उदाहरणे भारतीय संस्कृतीच्या सणवारातून पाहायला मिळतात. आजचा मकरसंक्रांत हा असाच एक सण आहे. सूर्याचा मकर राशीत होणारा प्रवेश ही सृष्टीच्या कालचक्रातली अतिशय सहज आणि स्वाभाविक गोष्ट ठरते. परंतु या छोट्याशा बदलामधला मोठा आशय लक्षात आणून देण्याचे काम तितक्याच सहजपणे केले गेले आणि संक्रांतीला संक्रमणामध्ये परावर्तित करता येते असा आत्मविश्वासही जागवला गेला. शिशीर ऋतुतले हे वातावरण म्हणजे काही प्रमाणात झाडाझुडपांच्या पानगळीचा सुरुवातीचा काळ. वातावरणातला बोचरा वारा आणि रात्रीचा कालावधी कमी होऊन दिवसाचा काळ वाढत जातानाचा हा बदल व्यक्तीच्या आणि समाजाच्या मनाला उल्हसित करू शकतो आणि मग त्याला काही ना काही उपक्रमाची जोड दिली गेली पाहिजे. त्या हेतूतून भोगी संक्रांत, किंक्रांत अशा तीन दिवसांचे निमित्त जोडले गेले. ऊस, कडधान्य, गाजर, हरभरा, बोरं यासारखी याच ऋतूमध्ये उपलब्ध होणाऱ्या वस्तूंचे सेवन करण्याचा आग्रह धरला जातो. तिळाचे महत्व विशेषत्वाने सांगितले गेले आहे. त्वचा कोरडी पडू शकते आणि म्हणून एकूण शरीराला स्नेहनाची म्हणजेच तेलाची आवश्यकता असते. ते तेल तिळाच्या माध्यमातून शरीराला पुरवण्याची व्यवस्था यानिमित्ताने केली गेली. मिळालेला मनुष्यजन्म केवळ सुखकारकच नव्हे तर आनंदमय करण्याचा आणि सकारात्मक ऊर्जेची निर्मिती करण्याचा हा प्रयत्न यासाठीच महत्वाचा ठरतो. वातावरणाच्या या बदलातून मनावर शरीरावर कोणतेही संकट येऊ नये. म्हणजेच संक्रांत येऊ नये. यासाठीची घेतली गेलेली ही खबरदारी संक्रमणाला म्हणजेच नव्या बदलाला प्रवृत्त करणारी मानली गेली. म्हणजेच संकटांविषयी जाणीव करून देतानाच सावधानता बाळगण्याची, उपाययोजना करण्याची किंबहुना ते उपाय म्हणजेच विधायक उपक्रमांचे महत्व बिंबवणारे ठरवले गेले. अशा एका जाणीवपूर्वक विचारातून आणि अथक प्रयत्नांमधून व्यक्ती आणि समाजाला एका अर्थी जगण्याचे मर्म समजावून देण्याचे काम झालेले दिसून येते.

### छोटा बदल मोठा आशय

संक्रांत हा शब्द जरी वापरला जात असला आणि संक्रांत म्हणजे वाईट असा जरी त्याचा अर्थ काढला जात असला तरी तो ज्या उपक्रमाशी जोडला गेला आहे किंवा त्यातून जो विचार सांगितला गेला आहे. तो पाहिल्यावर संक्रांत किंवा संकटांची जाणीव करून देणारा आणि त्यानुसार आपल्या व्यवहारात बदल करण्याचे भान जागवणारा हा सण असल्याचे लक्षात घेतले पाहिजे. व्यक्तीगत पातळीवर वातावरणातल्या बदलावरून काही समस्या निर्माण होऊ शकतात. त्यावरच्या उपाययोजना सांगितल्या गेल्या आणि मग एकमेकांना तिळगुळ देण्यापासून ते रतसप्तमीपर्यंत हळदीकुंकवासारखे कार्यक्रम आयोजित करून उत्साह वाढवण्याचा हेतू साधला गेलेला दिसून येईल. कारण सामाजिक पातळीवरसुध्दा संकटे येतात. आणि अशावेळी समाजाने एकत्र राहाणे तिळगुळाप्रमाणे स्नेह आणि गोडवा टिकवून ठेवणे कसे अनिवार्य आहे हे त्यातून घडवून आणले गेले. व्यक्तीगत स्तरावरील मतभेद किंवा सामाजिक स्तरावरील वाद समस्या बाजूला ठेवण्याचे आणि एकमेकांमधला संवाद वृध्दिंगत करण्याचे उद्दीष्ट म्हणजेच संक्रांत आहे. जी खरोखरच मनाला सकारात्मकतेची जाणीव करून देते. इतक्या सहजपणाने घडणाऱ्या या गोष्टींकडे समाजाचे किंवा व्यक्तीचे लक्ष जाण्याची शक्यता उरत नाही कारण सणवारांची ही परंपरा विविध कार्यक्रम किंवा उपक्रमांनी बांधली गेली आहे. पण त्यामागेच दडलेले हे रहस्य कितीतरी नवे अर्थ उकलून दाखवतात. संक्रांतीला तीळगुळच देण्याचा आग्रह हा केवळ रिकामटेकडेपणाचा उद्योग ठरत नाही. तर सृष्टीतला हा अतिशय बारीकसा बदल म्हणजे ज्याची तुलना तिळाशी होऊ शकते. हा तिळमात्र बदल प्रत्येकासाठी किती महत्वाचा आहे किंवा त्याची तुलनाही होऊ शकत नाही. हे त्यातल्या विविध संदर्भांमधून जाणवल्याशिवाय राहात नाही. म्हणूनच संक्रांतीला किंवा संकटांना संक्रमणाचे भान देणारा हा सण केवळ एक कर्मकांडही ही तर भारतीय संस्कृतीच्या हजारो वर्षांपासून चालत आलेल्या जीवनशैलीची फार मोठी ओळख ठरते.

### संस्कृती आणि प्रवृत्ती

जर असेच सणवार किंवा उपक्रम तयारच झाले नसते. तर मनुष्य अधिक स्वार्थी झाला असता. त्याचा एकलकोंडेपणा अधिक वाढला असता. किंबहुना समाज म्हणून तो एकत्रही येऊ शकला नसता. ज्या सृष्टीचे बोट धरून तो आपले आयुष्य घालवत असतो. ती सृष्टीच त्याला अशा विविध बदलांमधून जगण्याचे नवे बळ देऊ शकते. ते बदल स्वतःसाठी उपयोगात आणण्याचे कौशल्य भारतीय संस्कृतीने दाखवले. त्यातली ही परिपक्वता किंवा समन्वयाची उदात्तता तितक्याच उदार मनाने मान्य केली पाहिजे. दुर्दैवाने ते सगळे विचार समजून घेण्याची तयारी दिसत नाही. त्याचा आजच्या काळाचा संदर्भ देऊन अधिक भक्कमपणे उपयोग करण्याची तयारीही दिसत नाही. कोणत्या ना कोणत्या निमित्ताने व्यक्ती आणि समाजाचे शुभचिंतन घडत राहावे एकमेकांमधला सुसंवाद नव्या संकल्पांना उभारी देत राहावा हे जर त्याचे फलित असेल तर सृष्टीतले हे संक्रमण समष्टिला समृध्द करणारेच ठरते. देशाच्या विविध भागात विविध नावाने साजरी होणारी मकर संक्रांत किंवा मकर संक्रमण विचारांना कृतीशील बनवते आणि अशा या परंपरेने कायम ठेवलेल्या कृतीतून प्रवृत्ती साकारण्याचे काम होत राहाते. म्हणूनच संस्कृतीला सुध्दा संक्रमणाची आवश्यकता असते. ज्यामुळे संस्कृतीवरची संक्रांतही टाळता येऊ शकते. अशा या संक्रमण पर्वाच्या निमित्ताने आमच्या वाचकांना आणि हितचिंतकांना मनःपूर्वक शुभेच्छा.